## प्रतिनियुक्तीने पद भरण्यासाठी मागणीपत्र.

क्र. आस्थापना/प्रबोधिनी/पदभरती प्रस्ताव/३६७/२०२१, दि.२९.४.२०२१.

डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती

डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेमध्ये राज्य प्रशिक्षण धोरण २०११ नुसार राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत शासन सेवेतील अधिकारी वर्ग-२ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग/कार्या-१२अ, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.११ मे, २०१५ मध्ये नमुद केलेली पदे भरण्याची कार्यपध्दती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत.

त्यास अनुसरुन शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई या विभागाच्या अधिपत्याखालील_डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या कार्यालयातील राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत खालील नमूद केलेली पदे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे मधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अशा संवर्गात इच्छूक किंवा पात्र उमेदवार न मिळून आल्यास निम्न संवर्गात व श्रेणीमध्ये समकक्ष पदावरील पदोन्नतीसाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचाही या पदावर प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल.

| अ.क्र. | पदनाम | गट | पदांची संख्या | पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक | अ | १ | १५६००-३९१०० +ग्रेड पे ७६०० |
| २ | निबंधक तथा सहायक प्राध्यापक वर्ग-१ | अ | १ | १५६००-३९१००+ग्रेड पे ५०००/- |
| ३ | सहायक प्राध्यापक वर्ग-१ | अ | ८ | १५६००-३९१००+ग्रेड पे ५०००/- |
| ४ | कार्यालयीन अधिक्षक/ स्टेनोग्राफर वर्ग-३ | क | १ | ९३००-३४८००+ग्रेड पे ४२००/- |
| | एकूण | | ११ | |

२. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील, तदनंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधी अधिकारी यांची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणा-या संवर्ग नियंत्रण प्राधिका-याच्या सम्मतीने हा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत वाढविता येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात टंकलिखित करुन त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे दि.२१/०७/२०२१ पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावे.

५. प्रतिनियुक्तीने नियुक्ती घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी ते सद्या शासन सेवेत असल्याबाबतचे त्यांच्या कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग(कार्या-१२), दि.१७.१२.२०१६ व समक्रमांक दि.१६.२.२०१८ व सामान्य प्रशासन विभाग/(कार्या-१२अ), दि.११.५.२०१५ मधील निर्धारित तरतुदी, अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत अर्जाची तपासणी करण्यात येईल.

७. प्रशासकीय विभागानी / संवर्ग नियंत्रक विभागानी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांचे आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाचे गोपनिय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थीतीत दि.२१/०७/२०२१ पर्यंत पाठवावेत. विहीत मूदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी/कर्मचारी यांचा विचार केला जाणार नाही.

८. अंतिम दिनांकास प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र अर्जाबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

-सही -

**संचालक**

डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय
व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२अ)**

**परिशिष्ट : क**

**प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी सादर करावयाचा अर्जाचा नमुना**

१. नाव (संपूर्ण नाव) ____________________

२. ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व ____________________

कार्यालयाचे नाव : ____________________

३.(अ) सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण : ____________________

(ब) वेतनश्रेणी ____________________

४. सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग : ____________________

५. जन्म दिनांक : ____________________

६. अर्ज सादर करणेचे अंतिम दिनांकास वय (वर्ष व महिना) ____________________

७. शैक्षणिक अर्हता ____________________ :

८. मागासवर्गीय असल्यास प्रवर्ग : ____________________

९. सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा : ____________________

तात्पुरते आहे. नियमित असल्यास नियमित दिनांक ____________________

१० घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा ____________________ :

११. शैक्षणिक अर्हता व अनुभव :

शैक्षणिक अर्हता : १. ____________________

: २. ____________________

: ३. ____________________

अनुभव : १. ____________________

: २. ____________________

३. ____________________

१२. आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील :

(जागा कमी असल्यास स्वतंत्र विवरणपत्र जोडावे व

त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी)

| कार्यालय/विभाग | पद ( संवर्ग अथवा प्रतिनियुक्तीवर) | कालावधी | | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |

१३. संपर्क तपशील -----

(अ) पत्ता :- ______________________

______________________

______________________

दूरध्वनी क्र. ______________________

ई मेल ______________________

भ्रमणध्वनी क्रमांक______________________

(ब) कार्यालयीन पत्ता :______________________

______________________

दूरध्वनी क्र______________________.

ई मेल ______________________

मी श्री/श्रीमती______________________असे प्रमाणित करते/करतो की, मी प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांच्या मागणीपत्रातील तपशील वाचले असून ,सदर पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून ,खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो यांची मला जाणीव आहे.

सही/______________________

नाव ______________________

पदनाम______________________

## प्रशासकीय विभाग व संवर्ग नियंत्रक विभागाने भरावयाचा तपशिल

प्रमाणित करण्यात येते की,

१. श्री/श्रीमती ---------------------------------- पद -------------- यांनी सादर केलेला अर्ज तपासला असून त्यांनी अर्जामध्ये दिलेली माहिती सेवा अभिलेखानुसार बरोबर आहे.

२. श्री/श्रीमती ---------------------------------- पद -------------- यांची प्रतिनियुक्तीच्या पदासाठी निवड झाल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येईल.

३. श्री/श्रीमती ---------------------------------- पद -------------- यांचेविरुध्द मनासे (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कोणतीही विभागीय चौकशी सुरु नाही अथवा त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार/लाचलूचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही.

४. श्री/श्रीमती ---------------------------------- पद -------------- यांचेविरुध्द कोणत्याही शिक्षेची अंमलबजावणी चालू नाही.

५. श्री/श्रीमती ---------------------------------- पद -------------- यांना मागील १० वर्षाच्या कालावधीमध्ये झालेल्या गंभीर अथवा किरकोळ शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| पद | शिक्षेचे स्वरुप | शिक्षा संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

६. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ---------------------------------- हे कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त नाहीत.

७. श्री/श्रीमती ---------------------------------- यांना प्रतिनियुक्तीने ------------ या पदावर --------------------- या कार्यालयात नियुक्ती करण्यास या विभागाची हरकत नाही.

८. श्री/श्रीमती ---------------------------------- यांच्या उपलब्ध असलेल्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

सही / -

दिनांक --------------

(नाव --------------)

पदनाम--------------

--------------विभाग